**आजचा सुविचार**

वेळ, सत्ता, संपत्ती आणि शरीर

साथ देवो न देवो,

परंतु चांगला स्वभाव आणि चांगले संबंध

कायम आयुष्यभर साथ देतात.

दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...

कृपया इथे स्कॅन करा

Plz Scan Here



वर्ष : ०५ | अंक : २२०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.२३ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## महाराष्ट्र केसरी फायनलचा हर्षवर्धन सदगीर ठरला विजेता

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२२, पुणे :** पुण्यातील वाघोली येथे ६८ व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे आयोजन रामकृष्ण अण्णा सातव पाटील यांनी केले होते. शालेय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे आणि कृषीमंत्री दत्तात्रय भरणे याच्या उपस्थितीमध्ये फायनल कुस्ती लावण्यात आली होती. फायनलमध्ये नाशिकच्या हर्षवर्धन सदगीर याने ४-३ ने विजय मिळवला. लाल कॉस्ट्यूममध्ये हर्षवर्धन सदगीर आणि निळ्या कॉस्ट्यूममध्ये महेंद्र गायकवाड खेळत होता. नाशिकला त्याच्या रूपाने दुसरी महाराष्ट्र केसरीची गदा मिळाला आहे. तर हर्षवर्धन हा महाराष्ट्राचा सातवा डबल केसरी ठरला आहे. शालेय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे आणि कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह अनेक नेते मंडळी आणि आजी-माजी खेळाडूंह मान्यवरांनी उपस्थिती लावली होती.



सहा मिनिटांचे दोन राऊंड असतात, त्यामधील पहिल्या राऊंडमध्ये दोघांनी एक एक गुण घेतला होता. पहिल्या राऊंडमध्ये गुणांची बरोबरी होती. दुसऱ्या राऊंडमध्ये दोघेही आक्रमक झाले होते. शेवटच्या दीड मिनिटांमध्ये तीन गुण मिळवत हर्षवर्धन सदगीरने आघाडी घेतली. गायकवाडनेही तीन गुण मिळवले पण वेळ संपल्याने तो पराभूत झाला.

**हर्षवर्धन सदगीर याचा प्रवास**

हर्षवर्धन सदगीर याने गादी विभागाच्या अंतिम फेरीमध्ये सोलापूर शहरच्या जयराम पाटील याला पराभूत केले होते. अंतिम फेरीमध्ये १०-० ने हर्षवर्धन याने एकहाती विजय मिळवला होता. उपांत्य फेरीमध्ये हर्षवर्धन सदगीर याने पृथ्वीराज पाटील याचा पराभव केला होता.

हर्षवर्धन सदगीर याने याआधी महाराष्ट्र केसरीचा २०१९चा किताब पटकावला होता. त्यावेळी त्याने वेताळ शेळकेला पराभूत करत पहिल्यांदा किताब पटकावला होता. त्यानंतर हर्षवर्धन याने सात वर्षांनी फायनलपर्यंत कमबॅक करत विजेतेपदाच्या ट्रॉफीवर नाव कोरले.

महेंद्र गायकवाड याने माती विभागामध्ये चपळ चिता म्हणून देशभर प्रसिद्ध असलेल्या सिकंदर शेखला ३-०ने पराभूत केले होते. पहिल्या राऊंडमध्येच त्याने सिकंदरवर आक्रमण चढवलं होतं. सिकंदरसारख्या तगड्या मल्लाला त्याने एकही गुण घेऊन दिला नाही. त्याआधी झालेल्या उपांत्य फेरीत महेंद्र गायकवाड याने सोलापूरच्या रविराज चव्हाण याला पराभूत केले होते. रविराजचा महेंद्रने १०-० ने पराभव करत अंतिम फेरी गाठली होती.

महाराष्ट्र केसरी २०२६ चा विजेता हर्षवर्धन सदगीर याला मानाची गदा, फॉर्च्युनर कार आणि पाच लाख मिळणार आहे. तर उपमहाराष्ट्र केसरी महेंद्र गायकवाडला स्कॉर्पिओ आणि चार लाखांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. १८ बुलेटचही वजनी गटातील विजेत्यांना देण्यात आल्या आहेत. त्यासोबतच ८४० खेळाडू २०० पंच आणि खेळाडूंना ट्रॅक सूट आणि खेळाडूंना ड्राय फूटचा खुराक आयोजकांकडून देण्यात आला.

## गॅस वितरणातील त्रुटी दूर करण्यासाठी प्रशासनाने,
### तातडीने उपाययोजना राबवाव्यात - पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील





**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, अहिल्यानगर :** औद्योगिक क्षेत्रासमोर निर्माण झालेल्या गॅस तुटवड्याचा प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र व राज्य शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत असून, स्थानिक पातळीवर जिल्हाधिकारी व औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी गॅस वितरणातील त्रुटी दूर करण्यासाठी तातडीने उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देश जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

जिल्ह्यातील औद्योगिक वसाहतींमध्ये गॅस टंचाईमुळे निर्माण झालेल्या समस्यांच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या उपस्थितीत औद्योगिक वसाहतीच्या कार्यालयात आढावा बैठक पार पडली. या बैठकीस महापौर ज्योती गाडे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी गणेश राठोड, जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे, स्थायी समितीचे अध्यक्ष सुभाष लोंढे, विविध उद्योजक संघटनांचे प्रतिनिधी तसेच गॅस कंपन्यांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी डॉ. विखे पाटील यांनी औद्योगिक क्षेत्राकरिता आवश्यक असलेल्या गॅस पुरवठ्याचा सविस्तर आढावा घेतला व उद्योजकांच्या समस्या जाणून घेतल्या.

केंद्र व राज्य शासनाकडून आलेल्या नव्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे शैक्षणिक संस्था, वसतिगृहे व औद्योगिक वसाहतींमधील कॅन्टीन यांना वितरित करण्यात येणाऱ्या गॅसची माहिती जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी सादर केली. बैठकीत उद्योजकांनी प्रामुख्याने पीएनजी वाहिन्यांच्या जोडण्या होत नसल्याचे निदर्शनास आणून दिले. कंपन्यांकडे असलेल्या अपुऱ्या यंत्रणेमुळे गॅस जोडणीत अडचणी येत असल्याने, सर्व करारनामे पूर्ण करण्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे व मराठा चेंबर किंवा औद्योगिक वसाहतीच्या कार्यालयात स्वतंत्र यंत्रणा सुरू करावी, अशा सूचना डॉ. विखे पाटील यांनी दिल्या.ज्या उद्योजकांना जोडणी दिली आहे, त्यांना तातडीने गॅस पुरवठा सुरू करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

शहरात घरगुती गॅस जोडण्यांचे काम महापालिकेने वाढविलेल्या दरामुळे थांबले असून, याबाबत योग्य मार्ग काढण्याची सूचना पालकमंत्र्यांनी महापौर व स्थायी समिती अध्यक्षांना केली. जागतिक स्तरावरील आव्हानात्मक परिस्थितीत पंतप्रधानांनी केलेल्या उपाययोजनांमुळे देश खंबीरपणे उभा असल्याचे नमूद करत, उद्योजकांच्या राज्यस्तरीय प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्याची ग्वाही त्यांनी दिली. औद्योगिक वसाहतींमधील कॅन्टीनकरिता पन्नास टक्के गॅस उपलब्ध होणार असल्याने कामगारांना दिलासा मिळणार आहे. कामगारांचे स्थलांतर रोखण्यासाठी पाच दिवस काम सुरू ठेवण्याबाबत उद्योजकांनी एकत्रित येऊन निर्णय घ्यावा, यात प्रशासनही आवश्यक ती दक्षता घेईल असे स्पष्ट करण्यात आले. पाच किलो वजनाचे गॅस सिलिंडर व केरोसीनचा पर्याय उपलब्ध असल्याचे प्रशासनाने सांगितले. तसेच औद्योगिक वसाहतीमधील सर्व अतिक्रमणे व अवैध व्यवसाय पोलीस प्रशासनाची मदत घेऊन तातडीने निष्कासित करण्याची कार्यवाही प्रादेशिक अधिकाऱ्यांनी करावी, असे निर्देश ही पालकमंत्र्यांनी दिले.

## सुरेंद्र पठारेंनी सभागृहातच ठणकावले! सत्य समोर आलेच पाहिजे नाहीतर...

**अक्षराज : प्रणिल कुसाळे**

**दि.२२, पुणे :** पुणे महापालिकेच्या सभागृहात घडलेल्या एका वादग्रस्त प्रसंगावरून सध्या राजकीय वातावरण तापले असताना नगरसेवक सुरेंद्र पठारे यांनी थेट सभागृहातच आपली भूमिका स्पष्ट करत सर्वांचे लक्ष वेधले.

एका इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातून पठारे हे सभागृहात रील्स पाहत होते, असा आरोप करण्यात आला. या दाव्यानंतर राजकीय वर्तुळात आणि सभागृहातही चर्चा रंगली. पत्रकारांनी केलेल्या या आरोपांवरच पठारे यांनी सभागृहात उभे राहून आपली भूमिका स्पष्ट केली.

सभागृहात बोलताना त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, जर मी खरोखरच रील्स पाहत असल्याचे सिद्ध झाले, तर मी दिलगिरी व्यक्त करायला तयार आहे. मात्र त्यांनी याचवेळी ठाम इशाराही दिला की, जर मी रील्स पाहतच नसेन आणि विनाकारण माझ्यावर आरोप करून गालबोट लावण्याचा प्रयत्न केला जात असेल, तर संबंधित पत्रकारांनीही दिलगिरी व्यक्त करावी. पठारे यांच्या या भूमिकेमुळे सभागृहात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. त्यांच्या वक्तव्यामुळे एकीकडे जबाबदारी स्वीकारण्याची तयारी दिसून आली, तर दुसरीकडे विनाकारण बदनामी सहन केली



जाणार नाही, असा ठाम संदेशही त्यांनी दिला.

या संपूर्ण प्रकरणामुळे सभागृहातील शिस्त, लोकप्रतिनिधींचे वर्तन आणि माध्यमांची जबाबदारी या मुद्द्यांवर जोरदार चर्चा सुरू झाली आहे. काही सदस्यांनी अर्धवट माहितीच्या आधारे निष्कर्ष काढणे योग्य नाही असे मत मांडले, तर काहींनी सार्वजनिक पदावर असणाऱ्यांनी अधिक जबाबदारीने वागले पाहिजे अशी भूमिका घेतली.

दरम्यान, या वादामुळे राजकीय वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली असून नागरिकांमध्येही विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. मात्र पठारे यांनी सभागृहातच दिलेल्या स्पष्ट भूमिकेमुळे आता सर्वांचे लक्ष 'सत्य नेमके काय?' याकडे लागले आहे. एकूणच, या प्रकरणाने केवळ एका आरोपापुरते मर्यादित न राहता, जबाबदारी आणि पारदर्शकतेचा मोठा मुद्दा समोर आणला आहे.

## पथदिव्यांवरून 'मोफत वीज'चा धंदा !
### राहुरी खुर्द ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे गंभीर प्रकार उघड



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२२, राहुरी :** राहुरी खुर्द येथील ग्रामपंचायतीच्या पथदिव्यांमधून २४ तास सुरू असलेल्या वीजपुरवठ्याचा नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर गैरवापर होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गावातील काही नागरिकांनी थेट पथदिव्यांच्या वायरींना घरगुती कनेक्शन जोडून वीज वापर सुरू केल्यामुळे महावितरणच्या नियमित वीजपुरवठ्याला फाटा देत मोफत वीज वापरण्याचा प्रकार सुरू आहे.

गावातील अनेक ठिकाणी रस्त्यावरील पथदिवे दिवसरात्र सुरू असल्याचे दिसून येत आहे. या सततच्या वीजपुरवठ्याचा फायदा घेत काही नागरिकांनी बेकायदेशीररित्या वायरी जोडून घरगुती वापरासाठी वीज घेतली आहे. परिणामी, संबंधित नागरिकांकडून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (महावितरण) कनेक्शनचा वापर कमी झाला असून वीजबिल टाळण्याचा प्रयत्न होत आहे. हा प्रकार केवळ आर्थिक तोटाच नव्हे, तर गंभीर सुरक्षा धोकाही निर्माण करणारा आहे.

पथदिव्यांचा वापर हा केवळ सार्वजनिक सोयीसाठी असताना त्याचा अशा प्रकारे गैरवापर होत असतानाही ग्रामपंचायतीकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. २४ तास पथदिवे सुरू ठेवणे, त्यावर नियंत्रण न ठेवणे आणि अनधिकृत जोडण्यांकडे दुर्लक्ष करणे, यामुळे ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. विशेष म्हणजे, अशा प्रकारामुळे ग्रामपंचायतीच्या वीज बिलातही मोठी वाढ होत असून सार्वजनिक निधीचा अपव्यय होत असल्याची नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर, गावातील सुजाण नागरिकांनी संबंधित प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देऊन अनधिकृत वीजजोडण्या तोडाव्यात, पथदिव्यांच्या वेळा नियंत्रीत कराव्यात आणि दोषींवर कडक कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. अन्यथा, हा प्रकार भविष्यात आणखी गंभीर स्वरूप धारण करण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## पनवेल मनपा अतिक्रमणाविरोधी पथकाची कारवाई



**अक्षराज जे. के. पोळ**

**दि.२२, पनवेल :** महानगरपालिका प्रभाग समिती 'क' अंतर्गत अतिक्रमण विभागाच्या वतीने कामोठे येथील मानसरोवर रेल्वे स्थानक परिसरात अतिक्रमणाविरोधी कारवाई करण्यात आली. तसेच अग्निशमन दलासाठी राखीव असलेल्या प्लॉटवर झालेले अतिक्रमण हटविण्यात आले.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार मानसरोवर स्थानक परिसरात अनाधिकृतपणे उभारण्यात आलेल्या टपऱ्या व झोपड्यांवरती जेसीबीच्या सहाय्याने प्रभाग समिती 'क' च्या अतिक्रमण विभागाच्या वतीने मोठी कारवाई करण्यात आली. संबंधित विभागाच्या पथकाने नियोजनबद्धरीत्या ही मोहीम राबवून परिसर अतिक्रमणमुक्त केला.

याचबरोबर कामोठे येथील अग्निशमन दलासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या प्लॉटवरती अनधिकृत टपऱ्या, हातगाड्या, स्टॉल्स उभारण्यात आले होते. उपायुक्त नानासाहेब कामठे व सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग अधिक्षक दशरथ भंडारी यांनी जेसीबीच्या सहाय्याने याठिकाणी तोडक कारवाई करून संपूर्ण प्लॉट रिकामा केला. महापालिकेच्या वतीने अशा प्रकारच्या अनधिकृत अतिक्रमणांवर पुढेही कारवाई सुरूच राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

## महाराष्ट्राचे माजी मंत्री दत्ता मेघे यांचं निधन



**दि.२२, नागपूर :** भाजपचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री दत्ता मेघे यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे. ते ८९ वर्षांचे होते. विदर्भातील ज्येष्ठ राजकारणी आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ म्हणून त्यांची ओळख होती. दत्ता मेघे तब्बल चार वेळा खासदार म्हणून निवडून आले होते. नागपूर, रामटेक, वर्धा या मतदारसंघांचे त्यांनी प्रतिनिधित्व केलं आहे. त्यांच्या निधनाने राज्याच्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. माजी मंत्री दत्ता मेघे यांचा जन्म हा विदर्भात वर्धा येथे ११ नोव्हेंबर १९३६ रोजी झाला होता. त्यांनी राज्यसभा आणि महाराष्ट्राच्या विधान परिषदेचे सदस्य म्हणूनही काम पाहिले आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी आणि भाजपा असा त्यांचा राजकीय प्रवास राहिला आहे.

'नागर युवक शिक्षण संस्था'च्या माध्यमातून तसेच 'दत्ता मेघे इन्स्टीट्यूट ऑफ मेडीकल सायन्स' या महत्त्वाच्या संस्थांच्या माध्यमातून त्यांनी विदर्भातील ग्रामीण भागात शिक्षण सुविधा देण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. त्यांचे सुपुत्र हेही राजकारणात सक्रिय असून समीर मेघे हे विद्यमान आमदार आहेत. माजी मंत्री दत्ता मेघे यांच्या निधनाचे वृत्त कळताच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, औद्योगिक अशा विविध क्षेत्रातून शोक व्यक्त करण्यात आला आहे. दत्ता मेघे यांच्या निधननंतर मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ट्विट करत श्रद्धांजली वाहिली आहे. आयुष्यभर जोपासलेल्या सेवाभावी आणि दातृत्वाच्या वृत्तीने सामान्य माणसाच्या मनात कमालीचा आदर आणि श्रद्धा निर्माण करणारे ज्येष्ठ भाजपा नेते आणि माझे मार्गदर्शक आदरणीय दत्ताभाऊ मेघे यांच्या निधनाने सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील एक ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे, असं चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

अक्षराज






## जरा याद करो कुर्बानी...



दीडशे ते दोनशे वर्ष इंग्रजांच्या पारतंत्र्यात असणाऱ्या भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले. अनेक जण फासावर चढले तर कित्येकांनी इंग्रजांच्या गोळ्या छातीवर झेलल्या. या वीर स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत माता इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त झाली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी छातीवर गोळ्या झेलल्या तर अनेक स्वातंत्र्य सैनिक हसत हसत फासावर चढले. भगत सिंग, राजगुरू आणि सुखदेव हे स्वातंत्र्य सैनिक देखील भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी हसत हसत फासावर चढले आणि शहीद झाले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावणारे स्वातंत्र्य सैनिक शहीद भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी इंग्रजांनी फाशी दिली होती. आज २३ मार्च हा दिवस शहीदांच्या नावे कोरला गेला गेला आहे. आजच्याच दिवशी म्हणजे २३ मार्च १९३१ रोजी शहीद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या प्राणाचे बलिदान दिले. ९५ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी इंग्रजांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी दिली होती. देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी आजचा दिवस संपूर्ण देशात शहीद दिवस म्हणून साजरा केला जातो. १९२८ मध्ये सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले होते. या कमिशनला विरोध म्हणून लाला लजपतराय यांनी मोठा मोर्चा काढला होता. सायमन कमिशनला विरोध करणाऱ्या लाला लजपतराय यांच्यावर इंग्रजांनी लाठीहल्ला केला. या लाठी हल्ल्यात लाला लजपतराय गंभीर जखमी झाले त्यातच त्यांचा मृत्यू झाला. लाला लजपतराय यांच्या मृत्यूनंतर संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट उसळली. लाला लजपतराय यांच्या मृत्युनंतर देशातील जहाल गटाचे स्वातंत्र्य सैनिक कमालीचे चिडले. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव आणि अन्य जहाल क्रांतिकारकांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्याची शपथ घेतली. लाला लजपतराय यांच्या मृत्यूच्या एक महिन्याच्या आतच या क्रांतिकारकांनी आपली शपथ पूर्ण केली आणि १७ डिसेंबर १९२८ रोजी ब्रिटिश अधिकारी सँडर्सला गोळ्या घालून ठार केले. काही काळ ते भूमिगत राहिले मात्र फितुरीमुळे ते पोलिसांच्या हाती लागले. ७ ऑक्टोबर १९३० रोजी इंग्लिश कोर्टाने भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावली. यानंतर भगतसिंग यांची शिक्षा कमी व्हावी यासाठी फेर याचिका दाखल करण्यात आली मात्र १० मार्च १९३१ रोजी ती याचिका कोर्टाने फेटाळली. २३ मार्च हा दिवस भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या फाशीसाठी निश्चित करण्यात आला. २३ मार्च १९३१ रोजी सकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आली. फाशीच्या वेळी या तिघांनी मेरा रंग दे बसंती चोला ...... हे गाणे गायले. फासावर लटकतानाही भारत मातेच्या या सुपुत्रांच्या चेहऱ्यावर कसल्याही प्रकारचे दुःख किंवा पश्चाताप नव्हता उलट भारत मातेसाठी फासावर जात असल्याचा अभिमान होता. आजच्या दिवशी भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य ज्ञात अज्ञात शहिदांना शहिद दिनी विनम्र अभिवादन!


**– श्याम ठाणेदार**

# भोंदूबाबा खरातांचे सैतानी कारनामे..!!

**!! ऐसे कैसे झाले भोंदू,**
**कर्म करोनी म्हणती साधू !!**
**अंगी लावूनिया राख।**
**डोळे झाकूनी करती पाप ||**
**गाऊनी वैराग्याच्या कळा।**
**भोगी विषयांचा सोहळा ||**
**तुका म्हणे सांगू किती।**
**जाणोनिया त्यांची नीती ||**

भारताच्या शास्त्रज्ञांनी, तंत्रज्ञानांनी आपल्या बुध्दिमत्तेच्या जोरावर चंद्राला गवसणी घातली. सर्व क्षेत्रात देशाची प्रगती झाली. सुशिक्षितांचे प्रमाण वाढले. सध्याच्या स्मार्ट फोन दूरसंचार क्षेत्रातल्या क्रांतीनंतरही भारतीय समाजाची अंधश्रध्दा, भोळेपणा, रूढीपरंपराच्या जोखडा तून मुक्तता मात्र झालेली नाही. परिणामी गेल्या काही वर्षात भारताच्या सर्वच भागात भोंदू, बुवा, साधू, तांत्रिक मांत्रिकांचे खूळ प्रचंड प्रमाणात वाढले आहे. समाजाच्या याच अंधश्रध्देची संधी साधत उपटसुंभ आणि मवाली वासनांध बुवांनी आपले स्तोम माजवले आणि त्यांच्या अंधश्रध्द भक्तांनी या असल्या मवाली भोंदूच्या पायावर लोळण घेत ही भोंदूगिरी अधिकच वाढवायचा करंटा उद्योग केला. आसाराम बापू, राम रहिम, रामपाल यासह अनेक ढोंगी बुवा महिलांवरचे अत्याचार, गुन्हेगारी, गुंडगिरी, खंडण्या अशा गुन्ह्यासाठी शिक्षा भोगल्या. भोळ्या भाबड्या भक्तांची संकटातून सुटका करण्याची ग्वाही देणारे हे भोंदू तुरुंगात खडी फोडायला गेले. भोंदू आणि ढोंगी बुवांचे बुरखे टराटर फाटले गेले. त्यांचे कटकारवाया, वासनाकांडे, चव्हाट्यावर आली. तरीही भारतीय समाजातला भोळसपणा मात्र संपलेला नाही, हे दुर्दैव होय आणि या असल्या भोंदू बुवाबाजीचे प्रस्थ अद्याप कायम असल्याने अलीकडेच वासनाकांडाने गाजायला लागल्याने तथाकथित तांत्रिक ज्योतिषी असल्याचा दावा करणाऱ्या भक्तांना लुटणाऱ्या महिलांची अब्रू घेणाऱ्या कॅप्टन अशोक खरातला पोलिसांनी बेड्या ठोकल्यानंतर त्याच्या बुवाबाजीचा जाहीर पंचनामा सुरू झाला आहे.



एक काळ व्यापारी जहाजावर कॅप्टन असलेला हा खरात निवृत्त झाल्यावर पाथर्डी पसिरात आला आणि त्याने आपल्याला ब्रह्मसाक्षात्कार झाल्याचा दावा करत आपले स्तोम माजवले. सर्वसामान्य भोळीभाबडी माणसेही त्याच्या भूलथापांना बळी पडली. इतकेच काय पण शासनाचे वरिष्ठ अधिकारी, मंत्री, संत्री, आमदार, खासदार, प्रतिष्ठित महिला यासह व्यापक प्रमाणात त्याच्या भक्तगणांची संख्या वाढत गेली. तो अनेक चमत्कार घडवत असल्याचे संतती होत नाही त्यांना संतती होत असल्याचा बोभाटा त्याच्या भक्तांनी केला. परिणामी या भोंदू आणि मवाली खराताचे प्रस्थ आणि दबदबा प्रचंड वाढला. त्याच्या तथाकथित ईश्वरी अवताराच्या खोट्या कथा रंगायला लागल्या आणि नेमका याच संधीचा लाभ उठवत या नीच माणसाने अनेक महिलांवर अत्याचार केले. निर्लज्जपणाचा कळस गाठत विवाहित महिलांना धमक्या देऊन त्यांच्याकडून खंडण्या वसूल करीत त्यांच्यावर अत्याचार केले. त्यातील एका पीडित महिलेने धाडसाने पोलीस ठाण्यात त्याच्या विरुध्द फिर्याद दाखल केली आणि या खराताचा ढोंगाचा बुरखा फाडला. त्याची पापे उजेडात आली. पोलिसांच्या प्राथमिक तपासात त्याच्या विकृत चाळ्याच्या ५८ ध्वनिचित्रफिती पोलिसांनी जप्त केल्या आहेत. याच बुवाबाजीचा फायदा घेत या खराताने थोडी थोडकी नव्हे तर अवघ्या १० वर्षात तब्बल २०० कोटी रुपयांची मालमत्ता आणि संपत्ती जमवल्याचे निष्पन्न झाले आहे. मंत्री, आमदार, महिला आयोगाच्या अध्यक्षासह शेकडो महिलाही त्याच्या नादी लागल्या होत्या. शेकडो जणांचे जीवन उद्धवस्त करणारा हा चमत्कारी, वासनांध बाबा आता मात्र पोलिसांचा पाहुणचार घेतो आहे. हे सारे प्रकरणच संतापजनक आणि सुन्न करणारे आहे. आपला समाज या असल्या भोंदू बुवाबाजीच्या कराल विळख्यातून कधी मुक्त होणार...?

# उन्हाळ्यात पशु-पक्षांची काळजी घ्या !

लोकसंख्या जशी वाढत गेली तशी माणसाच्या मूलभूत गरजा पुरवणारी नैसर्गिक साधने कमी पडू लागली. शहरासारख्या ठिकाणी राहण्यासाठी टोलेजंग इमारती उभारल्या जाऊ लागल्या, वाहतुकीसाठी नवनवीन महामार्ग, उड्डाणपूल तयार केले जाऊ लागले, वीजनिर्मितीसाठी निरनिराळे प्रकल्प उभारले जाऊ लागले आणि यासर्व बाबींना 'विकास' असे गोंडस नाव दिले गेले. मागील ३०-४० वर्षांत विकासाच्या नावाखाली झाडांची मोठ्या प्रमाणात कत्तल करण्यात आली आहे. नैसर्गिक संपत्तीवर जीवन असलेल्या प्राणिमात्रांचे, पशुपक्षांचे जीवन मात्र यामुळे धोक्यात येऊ लागले. लोकवस्त्या निर्माण करण्यासाठी मानवाने जंगलांवर अतिक्रमण केले, डोंगर नद्या कह्यात घेतल्या. बुद्धिमान मनुष्यप्राण्यापुढे आपले काही चालणार नाही म्हणून प्राण्यांनी आपली स्थाने बदलली. गेल्या दहा-बारा वर्षांत देशासह राज्यात नैसर्गिक कोप झाल्यासारखी परिस्थिती उद्भवू लागली आहे. ऋतुचक्रात फेरफार होऊ लागला आहे. अतिवृष्टीनंतर यंदा सर्वांना उष्माघाताचा सामना करावा लागत आहे. विकासाच्या नावाखाली नैसर्गिक संपत्तीवर केलेल्या अतिक्रमणाचेच हे दुष्परिणाम आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. उन्हाच्या तडाख्यामुळे आज मनुष्यप्राणी हवालदिल झाला असला, तरी कृत्रिम थंडावा निर्माण करण्यासाठी त्याच्याकडे पंखे, कुलर, वातानुकूलित यंत्रे यांसारखी आधुनिक साधने आहेत, पशुपक्षांना मात्र सर्वस्वी नैसर्गिक थंडाव्यावर अवलंबून राहावे लागते. शहरासारख्या ठिकाणी वृक्षतोडीमुळे हा गारवा नष्ट झाला आहे. अन्नाच्या आणि पाण्याच्या शोधात मानवी वस्त्यांत, शहरांत येणाऱ्या पक्षांना उष्माघाताचा सामना करावा लागतो. अन्न-पाण्याच्या शोधात प्रखर उन्हातून फिरताना हे पक्षी चक्कर येऊन जमिनीवर कोसळतात ज्यामुळे त्यांच्या पंखांना आणि पायांना इजा होते. अशा जखमी अवस्थेत कोसळलेल्या पक्षांवर कुत्रे मांजरी हल्ला करतात त्यामळे त्यांची परिस्थिती आणखी बिघडते. वटवाघूळ, माकडे, खार, कोकिळा, पोपट, घार, कावळे, चिमण्या यांसारखे पशु पक्षी घायाळ होऊन रस्त्यांवर पडतात. पशु पक्षांवर ही जी काही प्रतिकूल परिस्थिती ओढवली आहे त्याला सर्वस्वी मानव जबाबदार असून त्याचे प्रायश्चित्त म्हणून उष्णतेने हवालदिल झालेल्या या पशु पक्षांसाठी प्रत्येकाने काहीनाकाही करायला हवे. आपल्या घराच्या खिडकीमध्ये, बाल्कनीमध्ये पक्षांना सहज उपलब्ध होईल असे धान्य, खाद्य आणि पाण्याची व्यवस्था करा तसेच ते पाणी नियमितपणे बदला. काही पक्षीमित्र संघटना या दिवसांत पशुपक्षांसाठी ठिकठिकाणी कृत्रिम पाणवठे आणि खाद्याची व्यवस्था करत आहेत. अपुऱ्या निधीमुळे यांना त्यांच्या कार्यात मर्यादा येत आहेत अशा संघटनांशी संपर्क साधून त्यांना सहकार्य करा ! रस्त्यावर कुठे घायाळ अवस्थेतील पक्षी किंवा प्राणी दिसून आला,तर त्याला त्वरित वैद्यकीय उपचार मिळण्यासाठी प्रयत्न करा. एरव्ही प्राणिसंग्रहालयांत आनंदाने बागडणारे पशु पक्षी आपणा सर्वांनाच आवडतात. प्राणिसंग्रहालयातील पशु पक्षांना व्यवस्थापनाकडून नियमितपणे पाणी आणि खाद्य पुरवले जाते मात्र बाहेर स्वच्छंदपणे वावरणाऱ्या पशु पक्षांना आपल्या आणि आपल्या पिल्लांच्या अन्न आणि पाण्याच्या शोधात वणवण फिरावे लागते. आज त्यांच्यावर उद्भवलेल्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्यांना दिलेला अल्पसा आधारही त्यांचे जीवन वाचवू शकतो त्यामुळे ही संधी आपण सोडता कामा नये !



**– जगन घाणेकर, घाटकोपर**
**संपर्क : ९६६४५५९७८०**

# पाण्याचा दिवस की, आपल्या अस्तित्वाचा प्रश्न?

२२ मार्च. दिनदर्शिकेतला एक साधा दिवस. पण त्याला एक नाव आहे ` थेॲश्रव थरींशॲ ू. आपण तो साजरा करतो, शुभेच्छा देतो, पोस्टर्स शेअर करतो, संदेश लिहितो. काही क्षणांसाठी आपण सगळेच जागरूक नागरिक बनतो. पण या सगळ्या गडबडीत एक प्रश्न शांतपणे उभा राहतो ` आपण खरंच पाण्याबद्दल जागरूक आहोत का, की फक्त एक दिवस साजरा करून स्वतःला दिलासा देतो आहोत?

पाणी हा शब्द उच्चारला की आपल्या मनात नदी, पाऊस, धबधबा, किंवा थंड पाण्याचा एक ग्लास उभा राहतो. पण त्यामागे एक सत्य आहे ` पाणी हा केवळ निसर्गाचा भाग नाही, तो आपल्या अस्तित्वाचा पाया आहे. आपण जे खातो, जे पितो, जे श्वास घेतो, त्या प्रत्येक गोष्टीत पाण्याचा अंश आहे. आणि तरीही, आपण त्याला सर्वात सहज उपलब्ध गोष्ट समजून त्याची किंमत विसरतो.

एक छोटासा अनुभव सांगतो. एका गावात गेलो होतो. तिथे एक लहान मुलगा हातात रिकामी बादली घेऊन विहिरीजवळ उभा होता. मला वाटलं तो पाणी भरायला आला आहे. पण थोड्या वेळाने लक्षात आलं ` तो पाणी भरत नव्हता, तो पाणी यायची वाट पाहत होता. त्याच्या चेहऱ्यावर अधीरता नव्हती, राग नव्हता, फक्त एक सवय होती ` पाण्याची वाट पाहण्याची सवय. त्या क्षणी शहरातल्या आपल्या आयुष्याची आठवण झाली. आपण नळ उघडतो, आणि दोन सेकंद पाणी नाही आलं की म्हणतो ` आज प्रेशर नाही. आपल्या अस्वस्थतेत आणि त्या मुलाच्या शांततेत एक मोठा फरक होता. त्याच्यासाठी पाणी ही अपेक्षा होती, आणि आपल्यासाठी ती सवय झाली आहे.

आपण पाण्याचा वापर कसा करतो याकडे पाहिलं तर आपल्याला स्वतःचं चित्र दिसतं. दात घासत असताना नळ चालू ठेवणं, अंघोळ करताना गरजेपेक्षा जास्त पाणी वापरणं, गाड्या धुताना पाण्याचा ओघळ चालू ठेवणं ` हे सगळं इतकं सामान्य झालं आहे की त्यात चूक दिसत नाही. पण खरं पाहिलं तर ही चूक नाही, ही एक सवय आहे ` आणि प्रत्येक वाईट सवयप्रमाणेच तीही हळूहळू मोठं नुकसान करत जाते.

आपण नेहमी म्हणतो की पाणी वाचवा. पण वाचवणं हा शब्द आपण किती मनापासून घेतो? पाणी वाचवणं म्हणजे केवळ कमी वापरणं नाही, तर त्याची किंमत ओळखणं आहे. जेव्हा आपण एखादी गोष्ट सहज मिळते म्हणून तिची किंमत करत नाही, तेव्हा आपण तिला गमावण्याच्या दिशेने चालत असतो. पाण्याबाबतही हेच होत आहे. आपण ते गृहित धरतो, आणि म्हणूनच त्याचं महत्त्व आपल्याला ते कमी झाल्यावरच जाणवतं.

निसर्ग आपल्याला नेहमी शिकवत असतो. पाऊस पडतो, पण तो कधीही अतिरेक करत नाही जोपर्यंत आपण त्याचा समतोल बिघडवत नाही. नद्या वाहतात, पण त्या स्वतःचा मार्ग शोधतात. झाडं पाणी साठवतात, जमिनीला ओल ठेवतात. निसर्गात प्रत्येक गोष्ट संतुलनात आहे. पण माणूस त्या संतुलनाशी खेळतो. तो नद्या अडवतो, जंगलं तोडतो, पावसाचं पाणी वाहून जाऊ देतो, आणि मग जेव्हा दुष्काळ येतो तेव्हा तो निसर्गालाच दोष देतो. खरं तर निसर्ग शिक्षा करत नाही, तो फक्त आपल्याला आपल्या कृतींचे परिणाम दाखवतो.

आपण अनेकदा विचार करतो ` मी एकटा काय करू शकतो? हा प्रश्न खूप सोपा वाटतो, पण त्यातच आपल्या निष्क्रियतेचं उत्तर दडलेलं आहे. कारण प्रत्येक बदलाची सुरुवात ही एका छोट्या कृतीनेच होते. जर प्रत्येकाने एक थेंब वाचवला, तर तोच थेंब एक दिवस नदी बनू शकतो. हे केवळ एक वाक्य नाही, ही एक शक्यता आहे. आपण जेव्हा एखादा नळ बंद करतो, तेव्हा आपण फक्त पाणी थांबवत नाही, आपण एक विचार सुरू करतो.

आपल्या घरात, आपल्या सवयींमध्ये, आपल्या विचारांमध्ये बदल करण्याची गरज आहे. पावसाचं पाणी साठवणं ही केवळ एक तांत्रिक प्रक्रिया नाही, ती एक मानसिकता आहे. मुलांना पाण्याची किंमत शिकवणं ही केवळ शिक्षण नाही, ती एक संस्कार आहे. समाजात जागरूकता निर्माण करणं ही केवळ जबाबदारी नाही, ती एक कर्तव्य आहे.

पण या सगळ्याच्या पलीकडे एक महत्त्वाची गोष्ट आहे ` आत्मपरीक्षण. आपण स्वतःला विचारलं पाहिजे की आपण पाण्याबाबत किती प्रामाणिक आहोत. आपण जे बोलतो, ते आपण करतो का? आपण जे शिकवतो, ते आपण पाळतो का? कारण बदल हा बाहेरून येत नाही, तो आतून सुरू होतो.

कल्पना करा, एक दिवस असा आला की तुमच्या घरात पाणीच नाही. नळ उघडला, पण काहीच आलं नाही. त्या क्षणी तुम्ही काय कराल? तुम्हाला त्या एका थेंबाची किंमत कळेल का? आणि जर कळली, तर मग आजच का नाही?

२२ मार्च हा केवळ एक दिवस नाही. तो एक स्मरण आहे ` आपण पाण्याचे मालक नाही, आपण त्याचे संरक्षक आहोत. आपल्याला ते जपायचं आहे, पुढच्या पिढ्यांसाठी, आपल्या स्वतःच्या भविष्यासाठी. कारण जर पाणी नाही, तर काहीच नाही.

आपण विकासाच्या नावाखाली खूप काही मिळवलं आहे. मोठी शहरं, उंच इमारती, आधुनिक सुविधा. पण या सगळ्यात आपण काहीतरी हरवत आहोत ` निसर्गाशी असलेलं नातं. आणि हे नातं तुटलं, तर त्याची किंमत खूप मोठी असेल.

आज गरज आहे ती केवळ बोलण्याची नाही, तर कृतीची. आपण लहान लहान गोष्टींनी सुरुवात करू शकतो. पाणी वाचवणं, त्याचा योग्य वापर करणं, इतरांना जागरूक करणं ` या सगळ्या गोष्टी एकत्र येऊन मोठा बदल घडवू शकतात.

आपण अनेकदा मोठ्या समस्यांबद्दल विचार करतो, पण त्यावर उपाय शोधताना आपण स्वतःला बाजूला ठेवतो. आपण वाट पाहतो की कोणी तरी येईल आणि बदल घडवेल. पण खरं पाहिलं तर तो कोणी तरी आपणच आहोत.

पाण्याचा प्रश्न हा केवळ पर्यावरणाचा विषय नाही, तो सामाजिक, आर्थिक आणि मानवी जीवनाशी जोडलेला आहे. पाण्याची कमतरता म्हणजे शेतीवर परिणाम, अन्नावर परिणाम, आरोग्यावर परिणाम. आणि शेवटी, तो आपल्या संपूर्ण जीवनावर परिणाम करतो.

आपण जर आज बदल केला नाही, तर उद्या उशीर होईल. आणि जेव्हा आपण मागे वळून पाहू, तेव्हा आपल्याला जाणवेल की आपण खूप काही गमावलं आहे. पण तेव्हा पश्चात्ताप करण्यापेक्षा आज कृती करणं अधिक महत्त्वाचं आहे.

पाणी ही एक साधी गोष्ट वाटते, पण त्यामागे एक मोठं तत्त्व आहे ` जीवनाचं तत्त्व. आणि त्या तत्त्वाला आपण जपलं पाहिजे.

शेवटी, एकच विचार मनात ठेवूया ` प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे. कारण तोच थेंब उद्याचं भविष्य घडवतो. आपण जर आज त्याला जपलं, तर उद्या तो आपल्याला जपेल.

आणि म्हणूनच, २२ मार्च हा दिवस साजरा करण्यापेक्षा, तो समजून घेणं आणि त्यानुसार जगणं अधिक महत्त्वाचं आहे.

कारण पाण्याचा प्रश्न हा केवळ पाण्याचा नाही
तो आपल्या अस्तित्वाचा प्रश्न आहे.

**- विजयकुमार कट्टी**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात


## राष्ट्रीय पॉलिमर्स कामगार संघावर निर्बंध लावा

### महाजेनको कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन कोराडीची मागणी

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२२, नागपूर :** येथील वीज केंद्रात कंत्राटदारांच्या विविध तक्रारी करून महानिर्मिती व कंत्राटदारांचा वेळ घेणाऱ्या तसेच कंत्राटदारांना मानसिक त्रास देणाऱ्या राष्ट्रीय पॉलिमर्स कामगार संघ व त्याचे नेते भीमराव बाजनघाटे यांच्या तक्रारीवर निर्बंध आणावे अशी मागणी महाजेनको कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन कोराडीच्या वतीने मुख्य अभियंता यांना लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. बाजनघाटे यांनी आपल्या संघटनेच्या माध्यमातून एबीयू कन्स्ट्रक्शनच्या विरुद्ध अनेक तक्रारी केल्यात काही प्रकरण न्यायालयात दाखल करण्यात आली. परंतु याबाबत संबंधित तक्रारीत कुठलेही सत्य आढळले नाही. निराधार करण्यात येणार्या तक्रारीमुळे महानिर्मिती व संबंधित कंत्राटदाराचा वेळ जातो. मानसिक त्रासाचा सामना करावा लागतो. राष्ट्रीय पॉलिमर्स कामगार संघ हा नोंदणीकृत संघ नाही. त्यामुळे यांच्याद्वारे करण्यात येणाऱ्या तक्रारीला महत्त्व देण्यात येऊ नये. यांचा उद्देश संबंधित कंत्राटदाराकडून आर्थिक फायदा करून घेणे असाच असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आलेला आहे. अनेक तंत्रज्ञानाबाबत केलेल्या तक्रारींमध्ये चौकशीत क्लीन चिट मिळालेली आहे. त्यामुळे अशा तक्रारी घेऊन केवळ संबंधित कंत्राटदाराला मानसिक त्रास देणे हाच उद्देश असतो. त्यामुळे या संघटनेवर निर्बंध आणावे जेणेकरून कंत्राटदार व महानिर्मिती यांचा वेळ जाणार नाही, अशी मागणी निवेदनाद्वारे असोसिएशनचे अध्यक्ष राजेश रंगारी यांनी केली आहे. निवेदनाच्या प्रती महानिर्मितीचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक, संचालक, कार्यकारी संचालक व मुख्य औद्योगिक संबंध अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे.

## पालशेत - निवोशी ग्रामपंचायतीचा ढिसाळ नियोजन; प्लास्टिक संकलन युनिट दुर्लक्षित



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२२, पालशेत (गुहागर) :** भुतलावरील वाढते प्लास्टिक प्रदूषण ही दिवसेंदिवस चिंतेचे कारण बनले आहे, प्लास्टिक प्रदूषणाशी लढा देताना राज्य शासनाकडून विविध योजना, उपक्रम राबविले जात आहेत, ग्रामपंचायत स्तरावरही प्लास्टिक प्रदूषणबाबत जनजागृती मोहीम राबविण्यात आली होती, याच मोहिमेचा धागा बनत गुहागर तालुक्यातील ग्रामपंचायत पालशेत – निवोशी वतीने मोठा गाजा–वाजा करत वाडी वस्तीवर, बाजारपेठ, समुद्र खाडी नजीक परिसरात स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) अंतर्गत सांडपाणी, घनकचरा, प्रकल्प (डीपीआर), सार्वजनिक प्लास्टिक संकलन युनिट कार्यन्वित करुन सदर युनिटमध्ये नागरिकांना प्लास्टिक कचरा जमा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. नागरिकांनी उपक्रमाला प्रतिसाद ही दिला परंतु संकलन केलेले प्लास्टिक कचऱ्यावर ग्रामपंचायतीने कोणतेही उपाययोजना केलेली दिसून येत नाही, नागरिकांनी संकलन केलेला प्लास्टिक कचरा आजपावेतो तसाच युनिट मध्ये आणि आजूबाजूला पडून आहे. त्यामुळे सदर कचरा आज पालशेत–निवोशी परिसरात साथीचे कारण बनत आहे. पावसाळ्यात या प्लास्टिक कचऱ्यामुळे डेंगू, मलेरिया, कावीळ सारख्या आजारांना नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. सदर युनिट हे लोखंडी जाळ्यांचे असल्याने अनेक ठिकाणी ते गंजलेले, जीर्ण झाल्याचे पाहायला मिळते. मागील वर्षी २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी पावसाळ्यात पालशेत येथील खाडी नजीकचे युनिट पुरामध्ये वाहून गेल्याचे समोर आले आहे. आश्चर्यकारक बाब अशी की वाहून गेलेले सदर युनिट पालशेत पाचमाड नजीकच्या खाडी पात्रात असल्याचे दिसून येते, परंतु अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या ग्रामपंचायतच्या प्रशासकीय यांनी सदर संकलन युनिट खाडी पात्रातून बाहेर काढण्याची साधी तसदी सुद्धा घेतली नसल्याने ग्रामपंचायत पालशेत – निवोशी प्रशासकांचे सदर उपक्रमाकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. पालशेत –निवोशी ग्रामपंचायतच्या ह्या ढिसाळ नियोजनामुळे शासनाचे हजारो रुपये पाण्यात गेल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे.

## रांजणगाव येथील श्री साई दिंडीचे शिर्डीकडे प्रस्थान



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.२२, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील सुपा पंचक्रोशीतील रांजणगाव मशिद येथील श्री साई बाबा देवस्थान च्या वतीने गेली १७ वर्षा पासुन श्री साई बाबा पालखी दिंडी ही पायी दिंडी शिर्डीकडे प्रस्थान करीत असते. सालाबाद प्रमाणे आज दि,२२ रोजी सकाळी ८ वाजता साई बाबांची महाआरती होउन टाळ, मृदुंगाच्या गजरात दिंडी ही अहिल्यानगरच्या दिशेने शिर्डीकडे रवाना झाली. कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतील सर्व साई भक्त, महिला मोठ्या संखेने उपस्थित होता. पायी दिंडी सोहळ्याचे नियोजन श्री साई बाबा मंडळाचे प्रमुख बाळासाहेब सोनवने, सुरेश गारकर(मेजर), बाळासाहेब गाढवे, बनकर मेजर, संतोष जवक, अक्षय जवक, मारुती गाढवे, ज्ञानेश्वर जवक (साईभक्त शिर्डी) यांनी केले. कार्यक्रमासाठी रांजणगावचे आदरास्थान राहुल शिंदे(पाटील),गावचे सरपंच महेश देशमुख, बंटी साबळे(मा,सरपंच), शरद सरोदे(मा,सरपंच), प्रा, चंद्रकात शिंदे ,राधाकृष्ण देशमुख, ह,भ,प, संपतराव जवक, भाउसाहेब येणारे अदी ग्रामस्त,महिला मोठ्या संखेने उपस्थित होते.

## नवी मुंबई महापौर चषक ४०+ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन २३ ते २५ मार्च रोजी

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२२, नवी मुंबई :** महानगरपालिकेच्या वतीने महापौर यांच्या पदनामाने विविध क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. या माध्यमातून खेळांना व खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे काम सातत्याने केले जात आहे. शहरातील ४०+ वयोमान असलेल्या खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे व शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त रहावे या हेतूने नवी मुंबई महापौर चषक ४०+ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन दि.२३ मार्च २०२६ ते २५ मार्च २०२६ या दरम्यान करण्यात आलेले आहेत.या स्पर्धेमध्ये ४० वर्षावरील वयोगटाचे नवी मुंबईतील ३० गावांतील ३३ संघ व तसेच शहरी विभागातील २५ संघ सहभागी होणार आहेत. ४०+ क्रिकेट स्पर्धेतील सामने दि.२३ मार्च २०२६ ते २५ मार्च २०२६ या कालावधीत महानगरपालिका मुख्यालयाजवळील मैदानावर होणार आहेत. या स्पर्धेतील विजयी व उपविजयी संघास आकर्षक चषक तसेच वैयक्तिक उत्तम कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. तरी या स्पर्धेतील संघाना प्रोत्साहन देणेकरिता नवी मुंबईतील क्रीडाप्रेमींनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम समितीचे सभापती गिरीश म्हात्रे यांनी केलेले आहे.

## ढवळपुरीत मंगळवारी दत्त मंदिराचा जीर्णोद्धार व मूर्ती प्राणप्रतिष्ठा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२२, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील ढवळपुरी येथील दत्तमळा (रानमळा) येथे असलेल्या ग्रामस्थांचे ग्रामदैवत श्री गुरुदेव दत्त या मंदिराचा समस्त ग्रामस्थ आणि श्रद्धावान देणगीदार यांच्या सहकार्याने लोकवर्गणीतून जीर्णोद्धार करून आकर्षक मंदिर उभारण्यात आले.

या मंदिराचा जीर्णोद्धार आणि गुरुदेवदत्त मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा नाशिक येथील पुरोहित महंताच्या हस्ते होणार आहे.

मंगळवार पासून दि.२४ मार्च ते बुधवार २५ मार्च २०२६ या दोन दिवसांमध्ये मंदिर वास्तुशांती, मंदिर शुद्धीकरण, प्रवचन, महाप्रसाद आदी विविध धार्मिक विधीचा कार्यक्रमांचे आयोजित करण्यात आले आहे. बुधवारी सकाळी ११ वाजता ह.भ.प जनार्दन महाराज मुंढे (पिंपळगाव रोठा) यांचे प्रवचन सेवा होणार आहे.

ढवळपुरी पंचक्रोशीतील सर्व नागरिकांनी उपस्थित राहून या कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन समस्त ग्रामस्थ दत्तमळा, रानमळा, मळई, भनगडेवाडी, भोंडवे वाडी, चितळकर वस्ती, गोकुळ मळा, दरेकर वस्ती यांच्या वतीने केले आहे.

या कार्यक्रमासाठी खासदार निलेश लंके, आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा संपूर्ण दोन दिवसीय कार्यक्रम संपन्न होत असताना तालुक्यातील अनेक मान्यवर व वारकरी मंडळी यावेळी उपस्थित राहणार आहे.

**कार्यक्रमाची रूपरेषा पुढीलप्रमाणे :-**

***मंगळवार, दि. २४ मार्च रोजी***

दुपारी १ वाजता मुख्य संकल्पना, गणेश पूजन, पुण्याह वाचन, नांदी शाद्धांत कर्म

दुपारी ०२ वाजता मूर्तींचे स्नपन, विविध मंडल स्थापन व पूजन

दुपारी ०३.३० वाजता मुख्य देवता ब्रह्मादिक मंडल स्थापना व पूजन, नवग्रह पूजन इशान वरून पूजन. दुपारी चार वाजता हवनारंभ. सायंकाळी ५.३० वा. मूर्तीचा धान्यदिवस सायंकाळी महाप्रसाद

***बुधवार दि.२४ मार्च रोजी***

सकाळी ०७ वा. देवतांचे पंचोपचार पूजन, सकाळी ८ वा. पर्याय हवन,मंडल देवता हवन, सकाळी ९ वा. पिंडीका देवता हवन, मुख्य देवता हवन, सकाळी २०.१३ वाजता मूर्तीची प्रतिष्ठापना, सकाळी २०.३१ वा. कलशारोहण विधी, सकाळी १०.४५ वा. पूर्णाहुती व आरती नंतर १२ ते ३ महाप्रसाद असे नियोजन आहे.

## वन्यप्राणी-मानव संघर्ष रोखण्यासाठी तातडीची अंमलबजावणी करा

### 30 दिवसांत भरपाई देणे अनिवार्य - आ.सुधीर मुनगंटीवार




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, चंद्रपूर :** वन्यप्राण्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे जिल्ह्यात होणारी मानवहानी, पशुधन हानी आणि पिकांचे नुकसान रोखण्यासाठी तसेच शासनाने निश्चित केलेली ३० दिवसांत नुकसानभरपाई देण्याची तरतूद काटेकोरपणे अंमलात आणण्याचे स्पष्ट निर्देश राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी बैठकीत वन विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील २० कलमी सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ.नितीन व्यवहारे, मुख्य वन संरक्षक रामानुजम, क्षेत्र संचालक शुक्ला, उपवनसंरक्षक वाघाये,उपवनसंरक्षक तलमले, वनविकास महामंडळाच्या दिव्या भारती आणि वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत वन्यप्राणी हल्ल्यांनंतर तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्तांना वेळेत मदत मिळावी. यासाठी कृषी व वन विभागाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त समिती गठित करण्याचे निर्देश त्यांनी दिले. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी तात्काळ भेट देऊन नागरिकांशी संवाद साधावा, असेही आ.मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले.बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजनेअंतर्गत समाविष्ट गावांची सविस्तर माहिती उपलब्ध करून देण्यासोबतच मंजूर व प्रस्तावित कामांची माहिती गावांमध्ये दर्शविणारे फलक लावण्याच्या सूचना ही त्यांनी दिल्या. तसेच वन्यप्राणी–मानव संघर्ष कमी करण्यासाठी आधुनिक एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर आ.मुनगंटीवार यांनी भर दिला. पोंभुर्णा व चंद्रपूर तालुक्यातील वनपरिक्षेत्रातील गावांच्या पुनर्रचनेसाठी बीट गार्डची संख्या वाढविणे, नवीन आकृतीबंध तयार करणे तसेच पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. तसेच ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा देशातील प्रमुख पर्यटन स्थळांच्या यादीत समावेश करण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे का, याचीही त्यांनी विचारणा केली. परिसरातील वीजपुरवठ्याबाबत महावितरणकडून सविस्तर माहिती सादर करण्याचे निर्देश देत, कॅम्प संदर्भात स्वतंत्र बैठक घेण्यात येणार असल्याचे आ.मुनगंटीवार यांनी यावेळी सांगितले. बैठकीत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मागील पाच वर्षांतील वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांमुळे झालेल्या मानव मृत्यूंचा सविस्तर आढावा घेतला. तसेच मानव–वन्यप्राणी संघर्ष टाळण्यासाठी वनविभागाकडून राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती त्यांनी जाणून घेतली व त्याबाबत आवश्यक निर्देश ही दिले.

## ॲसिड हल्लाग्रस्त विद्यार्थिनीची पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्याकडून विचारपूस



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, शिर्डी (अहिल्यानगर) :** जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रवरा ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत असलेल्या वडगावपान येथील ॲसिड हल्लाग्रस्त विद्यार्थिनीची भेट घेऊन तिच्या प्रकृतीची विचारपूस केली.

या घटनेतील आरोपींच्या मुसक्या आवळल्याशिवाय पोलीस प्रशासन स्वस्थ बसणार नाही, अशी ग्वाही त्यांनी माध्यमांशी बोलताना दिली. रुग्णालयातील वैद्यकीय पथकाने वेळेवर घेतलेल्या काळजीमुळे विद्यार्थिनीच्या प्रकृतीत पूर्णपणे सुधारणा झाली आहे. तिच्यावरील सर्व वैद्यकीय उपचार रुग्णालयामार्फत केले जात असून डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार तिला योग्य आहारही दिला जात असल्याचे डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

याप्रसंगी त्यांनी विद्यार्थिनीच्या आईची भेट घेऊन त्यांना धीर दिला. उपचाराचा सर्व खर्च रुग्णालय करत असल्याने कोणतीही चिंता करू नये व तपासाबाबत काही माहिती द्यायची असल्यास ती पोलीस प्रशासनाला द्यावी, असे ते म्हणाले. पोलीस त्यांच्या पद्धतीने योग्य तपास करत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या भेटीवेळी अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, प्रवरा वैद्यकीय प्रतिष्ठानचे विश्वस्त ध्रुव विखे पाटील, वडगावपानचे सरपंच श्रीनाथ थोरात यांच्यासह प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

## सामाजिक न्याय विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांची चित्ररथाद्वारे जनजागृती



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, हिंगोली :** जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती उपयोजना) सन २०२५–२०२६ अंतर्गत सामाजिक न्याय विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांची जिल्ह्यातील लाभार्थ्यांना माहिती व जनजागृती होण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने हिंगोली जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी आणि त्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून सामाजिक न्याय विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांची जिल्ह्यातील लाभार्थ्यांना माहिती देण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे. आज हिंगोली जिल्ह्यातील आजेगाव, सिंदफळ, थोरवा, हयातनगर, रिधोरा, हट्टा, आरळ, साखरा, बालेगाव, हिवरखेडा आदी गावामध्ये चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून सामाजिक न्याय विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांची जनजागृती करण्यात आली. या चित्ररथाच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती मिळण्यास मदत होणार आहे. हिंगोली जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला सामाजिक न्याय विभागाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी आणि त्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. याचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नवी मुंबईतील सर्व विभागांमध्ये जागतिक जल दिन साजरा

### पाणीपुरवठा विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी घेतली जलरक्षक शपथ




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, नवी मुंबई :** युनायटेड नेशन (वॉटर )या संस्थेच्या वतीने दरवर्षी २२ मार्च या दिवशी जागतिक जलदिन साजरा करण्यात येतो. स्वच्छ आणि ताज्या पाण्याच्या नैसर्गिक स्त्रोतांची काळजी घेणे आणि त्यांच्या शाश्वत संरक्षणासाठी कार्यरत राहणे हा संदेश प्रसारित करण्यासाठी जागतिक जल दिनानिमित्त संपूर्ण विश्वभरात १९९३ पासून विविध उपक्रम आयोजित केले जातात. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीनेही महापालिका आयुक्त डॉ कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे यांच्या माध्यमातून आठही विभाग कार्यालय क्षेत्रात मुख्य जलकुंभांच्या ठिकाणी कार्यकारी अभियंता तसेच पाणीपुरवठा विभागातील संबंधित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकत्र येत जागतिक जलदिन साजरा केला. जागतिक जल दिनाचे औचित्य साधून सर्व ठिकाणी सामूहिक जल शपथ घेण्यात आली.

# महसूलमंत्री बावनकुळे यांच्या मध्यस्तीने बेमुदत आमरण उपोषण मागे

## वेकोली पुनर्वसन जागेसाठी ९ कोटी जमा करणार; भीवा तांडेकर यांच्या आंदोलनाच्या पाचव्या दिवशी यश

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२२, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील भानेगाव ओपन कास्ट कोळसा खाणीत लाखो टन कोळसा उत्पादनाला सुरुवात झाली. मात्र, मागील ११ वर्षांपासून कामठी तालुक्यातील बिना(संगम) गावाचे पुनर्वसन प्रक्रिया रखडली होती, यासंदर्भात अनेक आंदोलने झालीत मात्र वेकोलिच्या वतीने दुर्लक्ष करण्यात आले.अखेर पुनर्वसन मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते भीवा तांडेकर यांनी १८ मार्च पासून बेमुदत आमरण उपोषण आंदोलन सुरू केले.

या आंदोलनाच्या पाचव्या दिवशी २२ मार्च रविवारला राज्याचे महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व रामटेक लोकसभा निर्वाचन क्षेत्राचे खासदार श्यामकुमार बर्वे यांनी आंदोलन स्थळाला भेट दिली. यावेळी जिल्हाधिकारी विपीन इटनकर, वेकोलिचे महाप्रबंधक हर्षद दातार, उपविभागीय अधिकारी संपत खलाटे, संजय पवार, तहसीलदार गणेश जगदाळे, राजेश रंगारी, विजय पाटील, राहुल तिवारी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हरिष रुमकर, सरपंच नारायण भडंग, उपसरपंच हरिष गजभिये यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी व शेकडोच्या संख्येत गावकरी उपस्थित होते.

भानेगाव ओपन कास्ट कोळसा खाणी साठी कामठी तालुक्यातील बिना(संगम) व सावनेर तालुक्यातील भानेगाव येथील शेकडो हेक्टर शेतजमिनी अधिग्रहित




भानेगाव ओपन कास्ट कोळसा खाणीमुळे जुन्या भानेगाव परिसरातील जवळपास ३१० घरे प्रभावित झाली आहेत. सदर गावाचे पुनर्वसन भानेगाव ग्रामपंचायत हद्दीत करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यासंदर्भात जागेची पाहणी करण्यात आली आहे. पुनर्वसन प्रक्रिया अंतिम टप्यात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

करून कोळसा खाण सुरू झाली.

मात्र बिना(संगम) व भानेगाव ही दोन गावे प्रभावित झाली. कोळसा खाणीमूळे बिना(संगम) येथील १३२५ व भानेगाव येथील ३१० घरे प्रभावित झाल्याने बिना(संगम) गावाचे पुनर्वसन करण्यासाठी मौजा दहेगाव रंगारी (रनाळा) येथील १८.८४ हेक्टर जागा भूसंपादन करण्यात आली. सदर जागेचा मोबदला ३०.३६ कोटी काढण्यात आला आहे मात्र या जागेपैकी वाद असलेल्या ४.२६ हेक्टर जागेचे प्रकरण सीबीआय कोर्टात प्रलंबित असल्यामुळे बिना(संगम) गावाची पुनर्वसन प्रक्रिया रखडली होती. सुरू असलेल्या अन्नत्याग आंदोलनाची दाखल घेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व खासदार श्यामकुमार बर्वे यांनी वेकोलिच्या अधिकाऱ्यांसोबत आंदोलन स्थळी चर्चा केली. यावेळी वेकोलिचे महाप्रबंधक हर्षद दातार यांनी २५ मार्च पूर्वी उपविभागीय अधिकारी सावनेर यांच्या कार्यालयात ९ कोटी रुपये जमा करणार असल्याचे लेखी स्वरूपात मान्य केले, शिवाय वाद असलेल्या ४.२६ हेक्टर जागेचा भूसंपादन मोबदला सीबीआय कोर्टात जमा करण्यात येईल असे जिल्हाधिकारी विपीन इटनकर यांनी यावेळी स्पष्ट केल्यानंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते उपोषणकर्ते भीवा तांडेकर यांना लिंबू शरबत पाजून उपोषण मागे घेण्यात आले.

याप्रसंगी बिना(संगम) येथील गावकऱ्यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. आठवडाभरात जिल्हाधिकारी, वेकोलि आणि बिना(संगम) वासियांची संयुक्त बैठक घेऊन मागण्यांवर तोडगा काढण्याचे आश्वासन देण्यात आले. बिना (संगम) गावाचा पुनर्वसनाचा तिढा सुटला असला तरी, जुने भानेगाव वासीयांचा पुनर्वसन प्रश्न जैसे थे आहे.

# पोलिसांना घरगडी म्हणणारे पालकमंत्री स्वतःच्या कुटुंबीयांना कोणत्या अधिकाराने पोलीस सुरक्षा देतात? - युवा नेते पाटणकर

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२२, पाटण (सातारा) :** सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शंभूराज देसाई यांनी आपल्या मंत्रिपदाच्या काळात पाटण तालुक्यात व जिल्ह्यात ज्या पद्धतीने प्रशासनावर दबाव टाकून स्थानिकांना त्रास देण्याचा प्रयत्न केला आता तेच प्रशासन त्यांच्यावर उलटल्याचा आरोप ते करत आहेत. पालकमंत्र्यांनी जे स्वतः केले तेच आता त्यांना ऑनलाइन फेडण्याची वेळ पोलिसांनी नि:पक्षपणे काम केल्याने त्यांच्यावर आणल्याने नियतीचा फेरा आता उलटा फिरला असून तो त्यांनाही चुकला नाही हे लक्षात घ्यावे. जिल्हा परिषदेत सत्ता स्थापनेत पोलिसांना घरगडी म्हणणारे हेच पालकमंत्री स्वतःच्या कुटुंबीयांना कोणत्या अधिकाराने पोलीस सुरक्षा देतात? याचा त्यांनी खुलासा करावा. जर महायुतीत त्यांच्यावर अन्याय होत असेल तर लोकनेते बाळासाहेब देसाई यांनी ज्या सन्मानाने मंत्रिपदाच्या खुर्चीवर लाथ मारली तोच लोकनेत्यांचा वारसा जपत स्वाभिमानाने ना. देसाईनीही आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा, असे खुले आव्हान भारतीय जनता पक्षाचे राज्य परिषद सदस्य सत्यजीतसिंह पाटणकर यांनी पाटण येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना केले.

यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले, मागील अनेक वर्षांपासून पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी पाटण तालुक्यातीलच नव्हे तर जिल्ह्यात प्रामुख्याने पोलीस, महसूल व अन्य विभागातील अधिकाऱ्यांवर दबाव टाकून अनेकदा स्थानिक जनता, विरोधकांना खोट्या गुन्ह्यात अडकवून वेठीस धरण्याचे प्रकार केले आहेत. अनेकदा बैठका, जाहीर सभांमध्ये प्रशासकीय, पोलीस अधिकाऱ्यांना अपमानास्पद वागणूक दिली याचे सोशल मीडियावर जाहीर वाभाडेही निघाले होते. मात्र तरीही त्याची कोणतीही तमा त्यांनी बाळगली नव्हती. आता तोच नियतीचा डाव त्यांच्यावर उलटल्यानंतर मग प्रशासन व पोलीस यंत्रणांवर ते बेछूट आरोप करत आहेत. वास्तविक जर त्यांच्या आरोपात तथ्य असेल तर मग ते महायुतीच्या सरकारमधून बाहेर का पडत नाहीत आणि आपणास स्वाभिमानी बाणा का दाखवत नाहीत ? भारतीय जनता पक्षाविरुद्ध अशा पद्धतीने तक्रारी करण्यापेक्षा त्यांनी मंत्रिमंडळ बैठकीत आपला राजीनामा सादर करावा अन्यथा सतालालसा हिच राजकीय अपरीहार्यता आहे हे देखील जनतेसमोर उघड झाल्याशिवाय रहाणार नाही. आतापर्यंत त्यांनी आपल्या मंत्री पदाचा गैरफायदा घेत मागेपुढे मला मोठा पोलीस फौजफाटा कशासाठी व कोणासाठी राबविला याचाही विचार करावा. आपल्याच जिल्ह्यात इतर मंत्री त्यांना असणारे पोलीस संरक्षण नाकारून सर्वसामान्य जनतेप्रमाणे वागतात मग यांनाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर संरक्षण कशासाठी लागते हा संशोधनाचा विषय आहे आणि जर हे स्वतःचे संरक्षण करू शकत नसतील तर मग पालकमंत्री म्हणून राहण्याचा याना नैतिक अधिकार आहे का याचाही विचार त्यांनी करावा.

जिल्हा परिषद पदाधिकारी निवडीत जर भाजपाकडून अन्याय झाल्याचा ना. देसाई आरोप करत असतील तर मग याच भाजपा महायुतीच्या सतेत राहण्यापेक्षा स्वाभिमानी बाणा दाखवत ते राजीनामा का देत नाहीत हे देखील तितकेच महत्वाचे आहे. शिवसेना फोडताना अग्रक्रमावर असणाऱ्या या मंडळीनी त्या काळात ज्या पद्धतीने पक्ष व पक्ष नेतृत्वाशी गद्दारी केली त्याचेच परिणाम आता नियती त्यांना भोगायला लावत असल्याचे ही स्पष्ट होत आहे. आपल्या आजूबाजूला पोलीस प्रशासनाला घरगडी बनवून स्थानिक प्रामाणिक, विरोधक कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल करणे व आपल्या बगलबच्चांवर भले मोठे गंभीर गुन्हे दाखल असतानाही पोलिसांनी त्यांच्यावर कारवाई करू नये म्हणून दबाव आणणे असे प्रकार यापूर्वीही अनेकदा घडले आहेत. जिल्हा परिषद पदाधिकारी निवडीत पोलिसांनी लोकशाही मार्गाने आपली भूमिका स्पष्ट केली. त्यामुळे त्यांचे अभिनंदन आणि यापुढेही पोलीस यंत्रणा निःपक्षपाती कारभार करेल आणि पाटण तालुकाच नव्हे तर संपूर्ण सातारा जिल्ह्यातून अशा अपप्रवृत्ती पोलीस यंत्रणा हद्दपार करेल, अशा अपेक्षा आहे. यासाठी त्यांना आमचे सर्वतोपरी सहकार्य राहील असे ठाम मतही सत्यजितसिंह पाटणकर यानी यावेळी शेवटी बोलताना व्यक्त केले.

# भेसळयुक्त खवा व पनीर विकणाऱ्यांवर कठोर कारवाईचे जिल्हाधिकारी यांचे आदेश

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२२, बुलढाणा :** जिल्ह्यातील दूध उत्पादन, दुधाचा वापर आणि दुग्धजन्य पदार्थांच्या निर्मितीतील ताळमेळ तसेच भेसळयुक्त पदार्थांच्या वाढत्या तक्रारींबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा दूध भेसळ नियंत्रण समितीची बैठक पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी भेसळयुक्त पदार्थ विकून ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या उत्पादक आणि पुरवठादारांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासनाला दिले आहेत.



अलीकडच्या काळात बाजारपेठेत पाम तेल, साखर आणि स्किम्ड मिल्क पावडरचा वापर करून तयार केलेला पदार्थ 'खवा' म्हणून, तर पाम तेलापासून बनवलेले 'चीज ॲनालॉग' हे 'पनीर' म्हणून विकले जात असल्याचे समोर आले आहे. हे पदार्थ प्रामुख्याने गुजरात राज्यातून १० किलोच्या बॅगांमध्ये 'स्पेशल बर्फी' किंवा प्लास्टिक डब्यांमध्ये 'हलवा' या नावाने येतात. नियमानुसार, असे पदार्थ विकताना ते पाम तेल व मिल्क सॉलिडपासून बनवलेले आहेत, याची स्पष्ट माहिती ग्राहकांना देणे विक्रेत्यांवर बंधनकारक आहे. मात्र, अनेक विक्रेते छुप्या पद्धतीने याची विक्री करत असून ग्राहकांची दिशाभूल करत असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर, हॉटेल, रेस्टॉरंट आणि मिठाई विक्रेत्यांनी आपल्या मेनू कार्ड किंवा फलकावर अशा पदार्थांची स्पष्ट माहिती द्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करताना सांगितले की, अन्नपदार्थ खरेदी करताना त्यावरील लेबल, घटक आणि प्रकार नीट तपासावेत. कोणत्याही संशयास्पद किंवा भेसळयुक्त पदार्थांबाबत अन्न व औषध प्रशासनाकडे किंवा १८००-२२२-३६५ या टोल फ्री क्रमांकावर त्वरित तक्रार नोंदवावी, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

# राहुरी विधानसभा पोटनिवडणूक खर्चाची काटेकोरपणे तपासणी करा - जिल्हाधिकारी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, अहिल्यानगर :** आगामी पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक खर्चाची काटेकोरपणे तपासणी करण्यासाठी निवडणूक आयोगाच्या सूचनांच्या प्रभावी अंमलबजावणी करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयात राहूरी विधानसभा मतदारसंघातील निवडणूक खर्च निरीक्षक व्ही. कुमार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी डॉ.आशिया बोलत होते. यावेळी अपर पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी दत्तात्रय कवितके, जिल्हा परिषदेचे मुख्य वित्त व लेखा अधिकारी शैलेश मोरे व विविध विभागांचे अधिकारी आदी उपस्थित होते.निवडणुकीच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेली सर्व भरारी पथके, स्थिर सर्वेक्षण पथके व नियंत्रण कक्षांनी कार्यान्वित करण्यात आले असून या सर्व पथकांनी दैनंदिन अहवाल वेळेत सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.खर्च निरीक्षक व्ही. कुमार म्हणाले, भारत निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार नियमित निवडणूक व पोटनिवडणूक यात कोणताही भेद नसून सर्व नियमांचे काटेकोर पालन होणे आवश्यक आहे. बँकांमधील संशयास्पद व्यवहारांची माहिती थेट प्राप्तिकर विभागाला कळवावी. राज्य उत्पादन शुल्क व पोलीस विभागाने अवैध मद्य व पैशांच्या वाहतुकीवर कारवाई करावी. स्थिर सर्वेक्षण पथकांनी तपासणी नाक्यांवर चोख बंदोबस्त ठेवावा. तसेच सर्व पथकांच्या वाहनांवर जीपीएस यंत्रणा कार्यान्वित करावी व त्यांच्या जागा अद्ययावत कराव्यात.व्हिडिओ सर्वेक्षण पथकाने राजकीय सभांचे चित्रीकरण करताना मंचाचा आकार, खुर्च्यांची संख्या व इतर व्यवस्थेची सविस्तर नोंद घ्यावी जेणेकरून खर्चाचा अचूक अंदाज बांधता येईल. समाजमाध्यमांवरील प्रचारावरदेखील विशेष लक्ष ठेवावे व उमेदवारांच्या खर्चाची मर्यादा चाळीस लाख रुपये असल्याने खर्चाच्या नोंदी अद्ययावत ठेवाव्यात. उमेदवारांची गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्यास ती वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्याबाबत कार्यवाही करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. सी-व्हिजिल प्रणालीवर येणाऱ्या तक्रारींचे तातडीने निवारण करावे, असे स्पष्ट करत सर्व पथकांनी समन्वयाने काम करून पारदर्शकपणे निवडणूक प्रक्रिया पार पाडावी, असे आवाहन ही या बैठकीत करण्यात आले.

# थोडक्यात

## जागतिक वन व जल दिनानिमित्त भोगावती नदी परिसरात वृक्षारोपण व नदी घाट स्वच्छता

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.२२, पेण (रायगड) :** जागतिक वन दिन व जागतिक जल दिनाच्या निमित्ताने पेण येथील भोगावती नदी परिसरात वृक्षारोपण व नदी घाट स्वच्छता असे दुहेरी उपक्रम उत्साहात पार पडले. सामाजिक वनीकरण विभाग, वन विभाग पेण, ॲम्बिशन ग्रुप महाडिक वाडी, साखर चौक गणेशोत्सव मंडळ गोळीबार मैदान तसेच प्रायव्हेट हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज पेण यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला.



सध्या वाढती लोकसंख्या, सिमेंट-काँक्रीटचे वाढते जाळे, वाहनांची गर्दी आणि औद्योगिक प्रदूषण यामुळे वनसंपत्ती, जलसंपत्ती आणि मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. जंगलांची मोठ्या प्रमाणावर होणारी तोड, डोंगरांचे उत्खनन आणि नद्यांमध्ये वाढता मानवी हस्तक्षेप यामुळे पर्यावरणीय संतुलन बिघडत आहे. पूर्वी बारमाही वाहणाऱ्या नद्या आज प्रदूषणामुळे गटारगंगा बनत चालल्या आहेत. प्लास्टिक कचरा, सांडपाणी आणि रासायनिक द्रव्यांमुळे नद्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. पाणी हे जीवन आहे असे आपण म्हणतो, मात्र त्याच पाण्याच्या स्त्रोतांचे आपणच मोठ्या प्रमाणावर नुकसान करत आहोत, ही चिंताजनक बाब आहे.

या पार्श्वभूमीवर नागरिकांनी वेळेत सावध होऊन जल, जंगल आणि जमीन यांचे संवर्धन करणे अत्यंत गरजेचे असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. अधिकाधिक वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन करणे तसेच नद्यांमधील प्रदूषण व अतिक्रमण रोखणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचेही यावेळी अधोरेखित करण्यात आले. या उपक्रमात वनविभागाचे आडे भाऊसाहेब, राऊत, सामाजिक वनीकरण विभागाचे श्री.दराडे, भोसले तसेच आशिष पाटील, महेश राऊत, महेश चाळके, निलेश म्हात्रे, उदय मानकवळे, मनोरमा मानकवळे आणि ॲम्बिशन ग्रुपचे सर्व सदस्य सहभागी झाले होते. सर्वांच्या सहकार्याने जागतिक वन दिन आणि जागतिक जल दिन मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले.

## माथेरानसाठी मोटर कारचा पर्याय पर्यटकांना नवी गती देण्याची मागणी



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२२, माथेरान :** निसर्ग सौंदर्याने नटलेले आणि वाहनमुक्त पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध असलेल्या माथेरान येथील मिनी ट्रेन पर्यटकांसाठी आजही मोठे आकर्षण आहे. मात्र, नेरळ ते माथेरान दरम्यानच्या रेल्वे सेवांमध्ये गेल्या काही वर्षांत झालेली कपात आणि प्रवासाचा वाढलेला कालावधी यामुळे पर्यटक व स्थानिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.पूर्वी नेरळ–माथेरान दरम्यान दररोज ५ फेऱ्या (ये-जा मिळून १०) चालत असत. परंतु सध्या केवळ दोन फेऱ्यांवर सेवा मर्यादित झाली आहे. २६ जुलैच्या महाप्रलयामध्ये रेल्वे ट्रॅकचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यानंतर दुरुस्तीच्या नावाखाली मोठा खर्च करण्यात आला. मात्र सेवा वाढवण्याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. सध्या मिनी ट्रेनचा प्रवास अडीच ते तीन तासांचा झाला आहे. पूर्वी हाच प्रवास सुमारे २ तासांत पूर्ण होत असे. त्यामुळे पर्यटकांना सुरुवातीला आकर्षक वाटणारा हा प्रवास पुढे जाऊन कंटाळवाणा ठरत असल्याच्या प्रतिक्रिया मिळत आहेत. अनेक पर्यटक एकदाच अनुभव घेतल्यानंतर पुन्हा ट्रेनने प्रवास करण्यास टाळाटाळ करतात.याच पार्श्वभूमीवर, Kalka Shimla Railway प्रमाणे 'मोटर कार' सेवा सुरू करण्याची मागणी जोर धरत आहे. सुमारे ४० वर्षांपूर्वी नेरळ–माथेरान मार्गावर मोटर कार धावत होती. या कारमध्ये १० ते १५ प्रवासी आरामात प्रवास करू शकत आणि कमी वेळात घाटमाथ्यावर पोहोचत असत. विशेषतः व्हीआयपी आणि पर्यटकांसाठी ही सेवा मोठे आकर्षण होती.मोटर कार सेवा पुन्हा सुरू केल्यास प्रवासाचा कालावधी कमी होऊन दीड तासांच्या आत प्रवास शक्य होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. यामुळे पर्यटकांना जलद, सुरक्षित आणि वेगळा अनुभव मिळू शकतो. तसेच मिनी ट्रेनच्या तुलनेत कमी मनुष्यबळ लागल्याने रेल्वे प्रशासनाचा खर्चही कमी होण्याची शक्यता आहे.स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, मोटर कारसाठी थोडा जास्त दर आकारला तरी पर्यटक तयार आहेत. त्यामुळे ही सेवा पर्यटनवाढीस चालना देणारी ठरू शकते. रेल्वे प्रशासनाने याबाबत सकारात्मक विचार करून नवी योजना राबवावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

## बल्लारशाह वनपरिक्षेत्राच्या माध्यमातून कारवा येथे वनराई बंधारा, वन्यप्राण्यांना आधार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२२, बल्लारपूर (चंद्रपूर) :** जागतिक वन दिन निमित्त बल्लारशाह वनपरीक्षेत्रात पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम राबविण्यात आला. वनपरीक्षेत्रातील कारवा येथील सुमो नाल्यावर वन विभागाच्या पुढाकारातून वनराई बंधारा बांधण्यात आला. या उपक्रमात वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी, पर्यटन सफारीमधील मार्गदर्शक (गाईड), वाहन चालक तसेच रोजंदारी कामगारांनी सक्रिय सहभाग नोंदविला. जलसंधारण व वनसंवर्धनाला चालना देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला असल्याचे वन विभागाने सांगितले. यावेळी क्षेत्र सहाय्यक देवराव टेकाम (कळमना), के. एन. घुगलोत (बल्लारशाह), ए. एस. पठाण (कारवा) यांच्यासह वनरक्षक सुधीर बोकडे, आशिष देवगडे, माया पवार, पूजा टोंगे, उषा घोळवे, वर्षा पीपरे, भारती तिवाडे, शीतल कुळमेथे, तसेच अनिल चौधरी, सुनील नन्नावरे आणि संयुक्त वनव्यवस्थापन समिती कारवा चे अध्यक्ष विनोद शिडाम आदी उपस्थित होते.कार्यक्रमाला आदेश कुमार शेडगे सहाय्यक वनसंरक्षक (वन व वन्य) मध्य चांदा वनविभाग, बल्लारशाह वनपरीक्षेत्र अधिकारी राजेंद्र. डी. घोरुडे प्रमुख उपस्थित होते. वनराई बंधाऱ्यामुळे पाण्याचे साठवण होऊन भूजल पातळी वाढण्यास मदत होणार असून परिसरातील वनसंपदा आणि जैवविविधतेचे संवर्धन होणार आहे. तसेच उन्हाळ्यात पाण्याच्या टंचाईचा सामना करणाऱ्या वन्य प्राण्यांना या बंधाऱ्यामुळे पाण्याची उपलब्धता होऊन त्यांनाही मोठा फायदा होणार आहे. वन विभागाच्या या उपक्रमाचे स्थानिक स्तरावर स्वागत करण्यात येत आहे.

